**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक २१/२०२०** **दिनांक १३/०३/२०२०** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०७/०३/२०२० ते १३/०३/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १४/०३/२०१९ सकाळी ८:३० पासून १८/०३/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७/०३ | ०८/०३ | ०९/०३ | १०/०३ | ११/०३ | १२/०३ | १३/०३ | | १४/०३ | १५/०३ | १६/०३ | १७/०३ | १८/०३ |
| - | - | - | - | - | - | - | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३२ | ३३ | ३४ | ३४ | ३३ |
| - | - | - | - | - | - | - | **किमान तापमान (अं.से)** | १९ | २० | २१ | २२ | २२ |
| - | - | - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ० | ० | ३ | ० | १ |
| - | - | - | - | - | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ६९ | ६७ | ६६ | ६६ | ६७ |
| - | - | - | - | - | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ५७ | ५६ | ५५ | ५४ | ५४ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ८ | ८ | ६ | ३ | ४ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याची दिशा** | आ.पु. | ई.पू. | आ.पु. | आ.पु. | द. |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक १४ ते १८ मार्च २०२० दरम्यान आकाश निरभ्र राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **वाल, चवळी** | **शेंगा अवस्था** | • वाल, चवळी इ. कडधान्य पिकावर रसशोषक किडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता येण्याची शक्यता असल्याने किडीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १२ मि. ली. किंवा लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **आंबा** | **फळधारणा** | • फळधारणा झालेल्या आंबा बागेमध्ये तुडतुड्याचा, फुलकिडीचा आणि भुरी रोगाचा प्रादुर्भाव आढळून येण्याची शक्यता असल्यामुळे मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार चौथी फवारणी (तिसऱ्या फवारणीनंतर १५ दिवसांच्या अंतराने) थायमेथाक्झाम २५ टक्के डब्ल्यु. जी. १ ग्रॅम + भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.<br>• फळधारणा झालेल्या आंबा बागेमध्ये (वाटाणा अवस्था), फळगळ कमी करण्यासाठी, पाण्याच्या उपलब्धतेनुसार १५० ते २०० लिटर पाणी प्रती झाडास या प्रमाणात १५ दिवसांच्या अंतराने ३ ते ४ पाण्याच्या पाळ्या दयाव्यात तसेच झाडाच्या बुंध्याभोवती गवताचे आच्छादन करावे.<br>• उत्पादन व फळांची प्रत सुधारण्यासाठी १ टक्के पोटॅशियम नायट्रेटची फवारणी फळे वाटाणा, गोटी व अंडाकृती अवस्थेत असताना करावी.<br>• फळे गोटी ते अंडाकृती आकाराची असताना डॉ.बा.सा.कों.कृ.विद्यापीठाने दिलेल्या शिफारशी नुसार फळगळ कमी करण्यासाठी, फळाचा आकार व वजन वाढून डाग विरहीत फळांसाठी, फळामधील साक्याचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि फळमाशीपासून संरक्षण करण्यासाठी २५ x २० सें.मी. आकाराची कागदी पिशवी लावावी.<br>• हापूस आंबा फळाचे अधिक उत्पादन मिळण्यासाठी ५५ टक्के तीव्रतेचे गोमूत्र, फळे वाटाण्याचा आकाराची असल्यापासून पुढे आठवड्याच्या अंतराने उपलब्धतेनुसार ३ ते ६ वेळा फवारावे. |
| **चिकू** | **फुलोरा ते फलधारणा** | • चिकू बागेस ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच झाडाच्या बुंध्याभोवती गवताचे आच्छादन करावे.<br>• चिकू पिकामध्ये फुलकळी पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के एस. जी. ४.५ ग्रॅम किंवा डेल्टामेथ्रीन २.८ टक्के प्रवाही १० मि. ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही १० मि. ली. किंवा प्रोफेनोफोस ४० टक्के प्रवाही १० मि. ली. प्रती १० लिटर पाण्यात या पैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी ५० टक्के फुले आल्यावर करावी. तसेच किडीच्या सर्वेक्षणासाठी निळ्या रंगाच्या प्रकाशसापळा बागेत बसवावा. |
| **कलिंगड** | **फुलोरा ते फलधारणा** | • कलिंगड पिकाला ३ ते ४ दिवसांच्या अंतराने नियमित पाणी द्यावे. पाण्याच्या अनियमित पाळ्या दिल्यावर फळे तडकण्याची शक्यता असते.<br>• कलिंगडाच्या फळांचे सूर्यप्रकाशापासून बचाव करण्यासाठी फळे भाताच्या पेंढ्याने किंवा गवताने झाकून घ्यावीत.<br>• कलिंगड पिकामध्ये फुले येण्यास सुरुवात झाल्यावर फळमाशीच्या नियंत्रणासाठी शेतामध्ये 'क्यु ल्युर' रक्षक सापळे प्रती हेक्टरी ४ वापरावे. वेळोवेळी किडग्रस्त फळे गोळा करून नष्ट करावीत. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**